पशुआरोग्य

# पोषक आहाराच्या अभावी दुधाळ जनावरांमध्ये उद्‌भवणारा 'दुग्धज्वर'



**डॉ. शिल्पा मोडेकर (साळुंके)**
(मो.नं. ९४२२२९०५५५)
विभागप्रमुख (शरीररचनाशास्त्र),
क्रांतिसिंह नाना पाटील
पशुवैद्यकीय महाविद्यालय,
शिरवळ, जि. सातारा





> दुग्धज्वराची लागण होण्याचा किंवा हा रोग उद्‌भवण्याचा सर्वसाधारण काळ मादी व्यायल्यानंतरच्या ७२ तासांपर्यंत असतो. म्हणजेच जनावर विण्यापूर्वी किंवा व्यायल्यानंतर लागलीच आजार उद्‌भवण्याची शक्यता असते. या आजारास प्रामुख्याने अयोग्य पोषणाने उद्‌भवणारा आजार हाच शब्द संयुक्तिक ठरेल; कारण हा आजार बाहेरून एखाद्या जीवजंतूच्या शरीरातील शिरकावामुळे न होता- पोषणमूल्यांच्या अभावामुळे शरीराच्या आतील स्नायूंची, ऊर्जेची निकड न भागवली गेल्याने होतो.

आपल्याकडे शेतीला पूरक असा अत्यंत महत्त्वाचा जोडधंदा म्हणजे दुग्धोत्पादन- अर्थात गोपालन. नवनवीन संशोधने आणि विकासाची कास धरलेला आजचा पशुपालक याच संशोधनांच्या आधाराने उत्पादनवाढ कशी साध्य करता येईल, याकरिता प्रयत्नशील असतो. याच दृष्टिकोनातून भरपूर व कमी वेळात जास्त दुग्ध उत्पादन देणाऱ्या निरनिराळ्या संकरित जातींचा उगम झाला. पण जितके उत्पादन जास्त तितकीच त्या जनावरांची पोषणमूल्यांची गरज देखील जास्त असते. त्यात पुन्हा अशी मादी प्रजनन अवस्थेत असेल अथवा नुकतीच व्यायली असेल तर तिच्या आहारातील पोषण मूल्यांचे महत्त्वही कैकपटीने वाढते. हा आहार संतुलित/ पोषक नसेल तर त्याचा थेट परिणाम उत्पादनक्षमतेवर तर होतोच पण त्याचबरोबर जनावरे अनेक आजारांना बळी पडू शकतात. याच प्रकारातील एक अत्यंत महत्त्वाचा आजार म्हणजे 'दुग्धज्वर'. दुग्धज्वर हा 'मिल्क फीवर' नावाने किंवा



'हायपोकॅलसेमिया' अथवा 'पारच्युरेंट पेरेसिस' या नावांनी देखील ओळखला जातो.

दुग्धज्वराच्या इतर नावांवरून लक्षात येतेच की सदर आजार हा दुग्धोत्पादन करणाऱ्या जनावरांमध्ये/ माद्यांमध्ये होतो. या आजाराचे महत्त्वाचे कारण म्हणजे पोषणमूल्यांचा अभाव असणारे खाद्य. गर्भावस्थेतील किंवा नुकत्याच व्यायलेल्या मादीला दिलेला आहार पोषणमूल्यांनी युक्त नसेल तर दुग्धज्वर होतो. सदर रोग उद्‌भवण्याची प्रमुख कारणे अधोरेखित करावयाची झाल्यास ती पुढीलप्रमाणे-

१. मादीला दिल्या जाणाऱ्या आहारात कॅल्शियमची कमतरता असणे.

२. आहारामधील पोषक तत्त्वांच्या अभावामुळे दुग्धोत्पादन घटणे.

३. पोषण आणि उत्पादन क्षमता अबाधित ठेवण्याकरिता आवश्यक मूल्यांचा/ खनिजांचा अभाव असणे इत्यादी.

आहार व्यवस्थापन योग्यरित्या केल्यास दुग्धज्वर टाळता येऊ शकतो. सदर आजार हा उच्च दूध क्षमता/ उच्च दुग्धोत्पादन क्षमता असणाऱ्या गायी- म्हशींमध्ये आढळतो. हा आजार झाल्यास अर्थिक नुकसान तर होतेच पण योग्य आणि वेळीच औषधोपचार न मिळाल्यास इतर आजारांना निमंत्रणही देतो. यात प्रामुख्याने किटोसिस, मस्टायटिस तसेच पोस्ट पार्च्युरंट हिमोग्लोबिन युरिया या आजारांचा समावेश करता येईल. सदर आजारातून सावरल्यानंतर जनावरांना प्रजननाशी निगडित व्याधी जडू शकतात.

दुग्धज्वराची लागण होण्याचा किंवा हा रोग उद्‌भवण्याचा सर्वसाधारण काळ मादी व्यायल्यानंतरच्या ७२ तासांपर्यंत असतो. म्हणजेच जनावर विण्यापूर्वी किंवा व्यायल्यानंतर लागलीच आजार उद्‌भवण्याची शक्यता असते. या आजारास प्रामुख्याने अयोग्य पोषणाने उद्‌भवणारा आजार हाच शब्द संयुक्तिक ठरेल; कारण हा आजार बाहेरून एखाद्या जीवजंतूच्या शरीरातील शिरकावामुळे न होता- पोषणमूल्यांच्या अभावामुळे शरीराच्या आतील स्नायूंची, ऊर्जेची निकड न भागवली गेल्याने होतो.

* विण्यापूर्वी आणि विताना मादीच्या शरीरावर येणारा ताण सहन करण्यासाठी लागणाऱ्या अतिरिक्त ऊर्जेची गरज ही कॅल्शियमद्वारे बऱ्यापैकी भागवली जाते. ती भागवली न गेल्यास मादीच्या स्नायूंमधील मजबूतपणा कमी होतो. स्नायू शिथिल होण्यास सुरुवात होते. उच्च उत्पादकता असणाऱ्या संकरित गायी- म्हशींमध्ये या आजाराचे प्रमाण ६ ते ८ टक्के एवढे आढळून येते. असे देखील निदर्शनास आले आहे की ५०% गायींमध्ये सुप्त प्रकारचा दुग्धज्वर आढळून येतो. याखेरीज विदेशी गायवर्गीय प्रजातींच्या मादीमध्ये- प्रामुख्याने जर्सी गोवंशामध्ये हा आजार होण्याची शक्यता सर्वात जास्त असते. सुप्त प्रकारच्या दुग्धज्वराच्या अवस्थेमध्ये ठळक लक्षणे दिसून येत नाहीत. म्हणूनच या अवस्थेला सुप्तावस्थेतील दुग्धज्वर म्हणतात. याखेरीज खाद्यात अचानक बदल केलेला असल्यास किंवा ऑक्झेलेटचे जास्त प्रमाण असलेल्या वनस्पती/ चारा पिके खाल्ल्यामुळे बऱ्याच वेळेस पचनाची अर्थात चयापचयाची क्रिया व्यवस्थित होत नाही. त्यावेळी देखील दुग्धज्वर होण्याची शक्यता वाढते. यासोबत बऱ्याच वेळेस असे देखील निदर्शनास आले आहे की मादी ज्यावेळी विते (प्रजननादरम्यान) त्यावेळी आतड्यातून कॅल्शियमचे शोषण

कमी होते. या आनुषंगिक कारणांमुळे म्हणजेच खाद्यातून मिळणाऱ्या पोषणमूल्यांच्या अभावी आतड्याचे विविध आजार उद्‌भवतात आणि अशा प्रकारे इतर आजारांना आपोआपच निमंत्रण दिल्यासारखे होते.

दुग्धज्वर बाधित मादी पुढील लक्षणे दाखवते–

१. **प्राथमिक अवस्था :** या अवस्थेत जनावर/ मादी खूप उत्साहात आहे असे जाणवते. ती अचानक स्नायूंमध्ये खूप ताकद आल्यासारखी वागते. (स्नायूंमध्ये तीव्र वेदना होत असल्याकारणाने ती मादी असे लक्षण दाखवते.) जनावर अशा अवस्थेत अतिसंवेदनशील बनते. त्याचे डोके खाली झुकते, जीभ बाहेर लोंबल्यासारखी होते. जनावर सतत दात (वरचे आणि खालील जबड्याचे) एकमेकांवर घासते. ज्याला आपण नेहमीच्या भाषेत 'दात खाणे' असे म्हणतो.

२. **लक्षणांचा दुसरा प्रकार :** याला गावाकडील भाषेत जनावर 'छातीवरील हाडांवर बसले' असे म्हणतात. या अवस्थेत जनावरास उभे राहता येत नाही. ते छातीच्या हाडावर बसते आणि मान विरुद्ध दिशेला वळवते. म्हणजेच जनावर इंग्रजीतील 'D' या आकारात बसल्याचे भासते. जनावर क्षीण झाल्याचे दिसते. शरीर थंड पडल्याचे जाणवते. नाकपुड्यांकडील भाग कोरडा होतो. डोळ्यांची आणि पापण्यांची हालचाल मंदावते. जनावर मलूल झाल्याचे लक्षात येते. एकंदरीतच सर्व हालचाली मंदावून जनावराचे लघवी आणि शेणाचे प्रमाण कमी होते.

३. **दुग्धज्वराची तृतीय अवस्था :** ज्या अवस्थेत जनावरास असह्य वेदना होऊन, त्यास उठणे किंवा बसणे



अशक्य होऊन जाते. ते धडपड करू लागते. हृदयाचे ठोके अति तीव्रतेने वाढतात. खूप पोटफुगी होते आणि शरीराच्या शिरा शिथिल पडलेल्या दिसतात.

दुग्धज्वर झाल्याचे निदान प्रयोगशाळेतील तपासण्यांद्वारे तसेच वर नमूद लक्षणांवरून आणि रक्तातील कॅल्शियमचे प्रमाण तपासून केले जाऊ शकते.

**उपचार :** सदर अवस्थेमध्ये योग्य निदान आणि तात्काळ उपचार खूप गरजेचा ठरतो. त्यामुळे आपल्या माहितीतल्या पशुवैद्यक डॉक्टरकडून इलाज करून घेणे अत्यंत गरजेचे आहे.

दुग्धज्वर टाळायचा असल्यास म्हणजेच आपले जनावर या अवस्थेत जाऊच नये असे वाटत असल्यास, मादी जनावरांच्या खुराकात पूरक आणि कॅल्शियमयुक्त खनिज मिश्रण योग्य आणि संतुलित प्रमाणात द्यावे. जनावर विण्यापूर्वी कॅल्शियमचे प्रमाण पशुवैद्यकाच्या सल्ल्याने जास्त मात्रेत द्यावे. वेळोवेळी रक्ताची तपासणी करून, त्यातील कॅल्शियमची पातळी तपासून घ्यावी. गाभण अवस्थेत स्वच्छ आणि मुबलक प्रमाणात पाणी खूप गरजेचे



असते. जनावर सतत बसून राहणार नाही याची काळजी घ्यावी. अशा प्रकारे सर्वार्थाने 'उपचारापेक्षा प्रतिबंध बरा' हेच योग्य ठरवणारा हा दुधाळ जनावरांमध्ये आढळून येणारा हा दुग्धज्वर. याच्या प्रतिबंधासाठी योग्य काळजी, समतोल आहार आणि वेळोवेळी केल्या जाणाऱ्या तपासण्या यांचा तक्ता हाताशी ठेवावा. पशुवैद्यकाच्या सल्ल्याने योग्य वेळी योग्य ते व्यवस्थापन आणि शारीरिक अवस्थांप्रमाणे खाद्यात बदल करावेत. असे झाल्यास या आजारापासून आपण दुधाळ जनावर/ गाभण गायी यांना नक्कीच दूर ठेवू शकू. ■